ऐ.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　N.C.R.B.

I.I.F.-1

0611

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 14/18 वर्ष Year 2018 दिनांक Date 26/03/2018
2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988 कलमे Sections 7, 13(1)(d) सह 13(2)
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from 17/03/18 वेळ Time पासून तारीख पर्यंत Date to 26/03/18 वेळ Time 17.20 वा.

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date 21/03/18 वेळ Time 14.00 वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 36/18 तारीख Date 26/03/18 वेळ Time 17.55 वा.
4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 20 कि.मी. चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र.

   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव म्युनिसिपल टॅक्स ॲसेसमेंट कार्यालय जवळील ठिकाणाचे नंबर गल्ली रस्त्याचे नाव
   Address of Occurence Name छत्रपती शिवाजी महाराज [illegible] ward, No. Name of road

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place गाव Village [illegible] पोस्ट Post कांदिवली तालुका Taluka (पश्चिम) जिल्हा Dist. मुंबई राज्य State 400101.

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........
   In case, outside the limit of this Police Station
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

   (a) नाव Name दिपक नागवेकर (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name यशवंत नागवेकर

   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age 67 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9594986421

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation मडलनीस

   (g) धर्म Religion हिंदू जात Caste जनजात Sub-Caste

   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward 9A, [illegible] घर/नाव नंबर House/Name No. [illegible] फोन/मो. नंबर Phone M. No. [illegible] पॅन नं. Pan No. ओळखपत्र नं. Card No.

   रस्त्याचे नाव Road कां. [illegible] जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place (पूर्व), गाव Village मुंबई पोस्ट Post 400101. P. Stn.

   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   (1) नियाज अहमद काझी, 45 वर्षे, निरीक्षक/अनुज्ञापन विभाग, आर साऊथ महानगरपालिका रोड कांदिवली (प), मुंबई रा. ठि. फ्लॅट नं. B/3, भाग्यश्री छाया, चरई, आवाज रेडिओ, ठाणे (प) (2) संदीप मारुती मोरे, 53 वर्षे, वरिष्ठ निरीक्षक/ [illegible]

फिर्याद    दि. 26/03/2018

श्री. दिपक अंकोजी नागवेकर, ६० वर्षे, धंदा. मत्स्यनीस (कुनिक्सल एंटरप्रायझेस), रा. बी. १A, नागवेकर अपार्टमेंट, आकुर्ली रोड, कांदीवली (पूर्व), मुंबई यांचा सविस्तर जबाब संगणकावर टंकलिखित करून स्वतंत्र कागदावर प्रिंट आऊट काढण्यात आली. त्या स्वतंत्र प्रिंट आऊट काढण्यात आलेल्या कागदावर फिर्यादीची स्वाक्षरी घेण्यात आली. सदर फिर्यादीस नमूद गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात यावी.

समक्ष

[signature] पो.
26/3/18

(राजेश कृष्णा मयेकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

[signature] 26/3/2018

78

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
रोख रक्कम रु.5,000/- (रु.500/- दराच्या 10 चलनी नोटा)

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ...... रोख रक्कम रु.5,000/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रोख रक्कम रु.5,000/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आलोसे नियाझ अहमद काझी व संदीप मारुती मोरे यांनी संगनमताने स्वतःचे अधिकाराचा गैरवापर करून शासकिय परितोषणा योजना फिर्यादी चालवत असलेल्या युनिक्लीन एंटरप्राइसेस कंपनी विरुद्ध योग्य सुरक्षा व्यवस्था नसलेबाबत कसुरी अहवाल पाठवणेची भीती घालून रु.1,000/- रोख रक्कम लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रु.5,000/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सापळा कारवाई दरम्यान आलोसे नियाझ काझी यांनी रु.5,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पूर्वनियोजित इशारा दिल्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार आलोसे काझी व मोरे यांना रंगेहाथ पकडले. म्हणून गुन्हा कलम 7, 13(1)(ड) सह 13(2) भ्र.प्र. अधिनियम, 1988 प्रमाणे नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अमलदाराचे नाव व हुद्दा ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ......

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P. S. ...... District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

26/7/2018      26/3/18

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name राजेश कृष्णा मचेकर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई.
Coding No. of I. O. ......

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

—फिर्याद— दिनांक— २६/०३/२०१८

श्री. दिपक व्यंकोजी नागवेकर, वय— ६७ वर्षे, धंदा व्यवसाय ( पत्नीच्या नावे असलेले मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस शास्त्रीय उपकरणे विक्री व सेवा) रा.ठि.३०१,सी विंग, नागवेकर अपार्टमेंट, आकुर्ली रोड, कांदिवली (पुर्व) मुंबई ४००१०१.
मो.क्र. ९५९४९८६४२१

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत जन्मापासुन राहतो. मी १९७१ ते १९८४ पर्यत कोशनीवाल ब्रदर्स प्रा.लि. या खाजगी कंपनी काम करीत होतो. मला पत्नी नामे श्रीमती उज्वल दिपक नागवेकर वय ६५ व दोन मुली असुन त्यांची नावे जागृती दिपक नागवेकर व आरती दिपक नागवेकर असे आहेत. माझी मोठी मुलगी नामे जागृती हिचे सन २०१५ रोजी लग्न झाले आहे व आरती ही स्वतचा फॅशन डिझाईनर चा व्यवसाय करीत आहे. माझी पत्नी हीचे स्वत:च्या मालकीची ९ अे, नागवेगर अपार्टमेंट, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) येथे सन १९८४ पासुन मे. युनिवर्सल इंटरप्रायझेस या नावाची शास्त्रीय उपकरणे विक्री व सेवा देण्याचे व्यवसाय करीत आहे.

मी एप्रिल १९८४ मध्ये कोशनीवाल ब्रदर्स प्रा.लि. या खाजगी कंपनीतुन वैयक्तिक कारणावरून राजीनामा दिला. त्यानंतर माझी पत्नी नामे श्रीमती उज्वल हीच्या बरोबर तिच्या मालकीची मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस या नावाची शास्त्रीय उपकरणे विक्री व सेवा देण्याकरीता मदत करतो. सदर व्यवसायतुन आमचा कुटुबियाचा उदरनिर्वाह चालतो.

मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस या नावाची शास्त्रीय उपकरणे विक्री व सेवा या व्यवसायाचे लायसन्स प्रत्येक वर्षी वेळोवेळी नुतनीकरण करतो.' सदर लायसन्स नुतनीकरण करण्याकरीता माझे कार्यालयातील वेगवेगळे कर्मचारी महानगर पालीका आर साउथ, कांदिवली (पुर्व), मुंबई येथे जावुन वेळोवेळी नुतनीकरण केले आहे.

दिनांक १७/०३/२०१८ रोजी आर/साउथ, कांदिवली (प) मुंबई येथील महानगर पालीकेच्या कार्यालयातुन लायसन्स डिपार्टमेंटचे अधिकारी श्री.मोरे व श्री. काझी यांनी ९ अे, नागवेगर अपार्टमेंट, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई येथील कार्यालयास भेट दिली. सदर भेटी दरम्यान मला वर नमुद दोन्ही अधिकारी यांनी '' तुमच्या कंपनीत सुरक्षा योग्य नसल्याबाबत कसुरी अहवाल पाठविण्यात येईल अशी भिती घालुन तुमच्या कंपनीविरूध्द कसुरी अहवाल पाठवु. कसुरी अहवाल पाठवु नये असे वाटत असल्यास आम्हा दोघांना गुडविल म्हणुन रू.९,०००/— दयावे लागतील असे बोलुन निघुन गेले.

मला वर नमुद लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आर/द,विभाग, कांदिवली (प) येथे नेमणुकीस असलेले श्री. काझी व मोरे यांचेविरूध्द दिनांक २१/०३/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे जावून तेथील वरिष्ठांना भेटलो. त्यांनी मला पोलीस निरीक्षक मयेकर व सहाय्यक

समक्ष
२६/३/१८
(राजेश मयेकर)
पो.नि./लाप्रवि. मुंबई

26/3/2018

पोलीस आयुक्त श्री.सुधिर कुडाळकर यांची भेट घालून दिली व मला तक्रार अर्ज लेखी देण्यास सांगितले असता, मी इंग्रजीमध्ये श्री. काझी व मोरे यांचेविरूध्द लेखी तक्रार अर्ज दिला.

त्यानंतर पो.नि.मयेकर यांनी मला दिलेल्या सुचनेनंतर लोकसेवक श्री.काझी यांचे मोबाईलवर संपर्क साधुन कामासंदर्भात चर्चा करून त्यांनतर त्या लोकसेवकांची प्रत्यक्ष भेट घेणार आहे असे सांगितले. त्यावेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. मला व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

पो.नि.मयेकर, स.पो.आ.कुडाळकर, पंच व मी असे लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी पो.नि मयेकर यांचे सुचनेवरुन एक पोलीस कर्मचारी यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर हजर केला. पो.नि मयेकर यांनी सदरहु कर्मचारी हे .पो.शि.क्र.०३-१४०१/दळवी असल्याचे ओळख करून दिली. सदर कारवाईमध्ये पो.शि.दळवी हे भाग घेणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.मयेकर यांनी प्रथम डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंचासमक्ष फॉरमॅट करून तो चालू करुन त्यामध्ये कोणतेही पूर्व संभाषण नसल्याची खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम माझे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. मला लोकसेवकाच्या मोबाईलवर संपर्क साधून कामासंदर्भात चर्चा करून त्यानंतर त्यांची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे सांगितल्याने, मला श्री. काझी यांचे मोबाईल क्र.९८६९१८६७२६ वर संपर्क साधुन त्यांनी स्वत:ची ओळख करून दिली व कामाबाबत चर्चा करावयाची आहे असे बोलले. त्यावेळी लोकसेवक काझी यांनी मला सांगितले की, ते ट्रेनमध्ये असल्याने नंतर थोडयावेळाने फोन करीन असे सांगुन फोन बंद केला.

. साधारण एक तास वाट पाहुन देखील लोकसेवक काझी यांचा मोबाईल फोन न आल्याने मी पुन्हा लोकसवक काझी यांचे वर नमुद मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी लोकसेवक काझी यांनी ते ''हेडऑफीस येथे मिटींग करता आल्याने व्यस्थ असल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक मोरे देखील व्यस्त असल्याचे सांगितले. त्यावेळी मी लोकसेवक काझी यास ते दोन तीन दिवसाकरीता कामाकरीता बाहेरगावी जाणार असल्याचे सांगितले.त्यामुळे लोकसेवक काझी यांनी दोन तीन दिवसांनी तुम्ही आल्यावर संपर्क साधा किंवा मी फोन करीन. तसेच आता मला मिटींगमध्ये जायचे आहे'' असे बोलुन मोबाईलफोन बंद केला.

मला लोकसेवक यांचे मोबाईलवरील संभाषण पुर्ण झाल्यावर लोकसेवक हे भेटणार नसल्याची खात्री झाल्याने पो.नि.मयेकर यांनी पडताळणी स्थगित करीत असल्याचे सांगितले.

दिनांक २३/०३/२०१८ रोजी दुपारी १३.१५ वा दरम्यान पुन्हा वर नमुद अधिकारी हे माझे कंपनीच्या कार्यालयात मला भेटण्यास आले. त्यावेळी मी उपस्थित

(signature) 26/3/18
(राजेश मयेकर)
पो.नि./ला.प्र.वि.मुंबई.

(signature) 26/3/2018

नव्हतो. त्यामुळे वर नमुद लोकसेवकांनी माझे कार्यालयातील व्यवस्थापिका कु.सुनिता हळदणकर यांना सांगितले की, ''तुमच्या ऑफीसमध्ये आम्हीच सारखे चकरा मारतो, तुमच्या साहेबांना दिनांक २६/०३/२०१८ रोजी आमच्या ऑफीसला पाठवा असे बोलुन रागाने निघुन गेले.

दिनांक २६/०३/२०१८ रोजी ठरल्यानुसार गोपनियतेच्या कारणास्तव पो.नि. मयेकर व स.पो.आ. ढेगळे व पथक असे आमचे मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस,आकुर्ली रोड, कांदिवली (प) मुंबई ४००१०१ या कार्यालयात पडताळणी करीता आले. सदर कार्यालयात पो.नि मयेकर यांचे सुचनेनुसार माझे व पंचाचे वक्तव्य घेण्यात आले. त्यानंतर माझे मोबाईल क्र. ९५९४९८६४२१ या मोबाईल फोनवरून श्री.काझी यांचे मोबाईल क्र.९८६९१८६७२६ वर दुपारी १३.३७ वा संपर्क साधला असता लोकसेवकाचा स्पष्ट आवाज ऐकु आला नाही. त्यामुळे मी पुन्हा १३.३९ वा.श्री.काझी यांचे मोबाईवर संपर्क साधला असता, त्यावेळी देखील काहीही बोललें ऐकायला आले नाही. त्यानंतर मी पुन्हा १३.४१ वा. श्री.काझी यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता, श्री.काझी असे म्हणाले की, '' मी तुमच्या कार्यालयात येतो, तुम्ही किती वाजेपर्यत कार्यालयात आहात, त्यावेळी आपण चर्चा करू असे बोलले असता मी त्यांना '' सध्यांकाळी साडेचार पाच पर्यत कार्यालयात असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक २६/०३/२०१८ रोजी पडताळणी दरम्यान १६.४५ वा चे सुमारास श्री.काझी व मोरे हे मला भेटण्यास मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस,आकुर्ली रोड, कांदिवली (प) मुंबई येथे आले. त्यावेळी मी त्या दोघांना आमचे कंपनीविरूध्द कसुरी अहवाल पाठवु नये असे विनंती केली असता त्यांनी माझेकडे गुडविल म्हणुन रू. ९,०००/— ची मागणी केली.सदरवेळी मी त्यांना मागणी केलेली लाचेची रक्कम रू. ९०००/— ही कमी करण्यास सांगितले असता त्यांनी तडजोडी अंती रू. ५०००/—ची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

सदरची वरील हकीकत मी पो.नि मयेकर यांना सांगितली. त्यानुसार पो.नि मयेकर यांनी पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणात श्री.काझी यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याची खात्री केली. त्यानंतर दिलेल्या सचनेनुसार मी माझेकडील रु. ५०००/—(रु.५०० च्या १० नोटा) पो.नि. मयेकर यांचेकडे दिल्या. तदनंतर पोनि मयेकर यांनी रु.५०००/— (रु.५००/—दराच्या १० भारतीय चलनी नोटा) पोलीस वाहनावरील पोलीस शिपाई चालक क्र.१४.१३६२/महेश पाटील यांचेमार्फत पंचासमक्ष अँथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली. सदरहु नोटा पोलीस चालक पाटील यांनी त्यांचे हाताने माझे शर्टाचे डाव्या खिशात ठेवल्या. तसेच पोलीस निरीक्षक श्री. मयेकर साहेब यांनी मला सापळा कार्यवाही संदर्भात सुचना दिल्या. त्याचप्रमाणे श्री. काझी व मोरे यांनी पैसे स्किारल्यानंतर डावा हात डोक्यावरुन फिरवून सापळा पथकास इशारा देण्याबाबत सांगितले. सदर सुचना दिल्यानंतर पो.नि. मयेकर यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री.गायकवाड यांचे समवेत श्री.काझी व मोरे यांना भेटण्यासाठी मे.

राजेश मयेकर
२६/३/१८
(राजेश मयेकर)
पो.नि./लाप्रवि,मुंबई.

२६/३/२०१८

युनिवर्सल इंटरप्रायझेस, आकुर्ली रोड, कांदिवली (प) मुंबई येथे पाठविले. त्यावेळी पंच श्री. पाटील हे पोलीस पथका बरोबर कार्यालयाच्या बाहेर थांबले.

सापळा कारवाई दरम्यान माझे शर्टाचे डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु.५०००/— ठरल्यानुसार माझे उजव्या हाताने काढुन श्री.काझी यांचेकडे दिले. त्यानंतर श्री.काझी व मोरे यांनी सदर लाचेची रक्कम स्किारल्यानंतर माझे कंपनीत योग्य सुरक्षा असल्याबाबत अनुकुल अहवाल दिला. सदर लाचेची रक्कम स्विकारून श्री.काझी व मोरे कार्यालयाच्या बाहेर जात असताना मला दिलेल्या सुचनेप्रमाणे केसावरुन डावा हात फिरवून श्री. काझी यांनी रक्कम स्वीकारल्याचा इशारा सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिला. त्यावेळी माझा इशारा मिळताच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी श्री.काझी व मोरे यांना ताब्यात घेतले.

तरी आज दिनांक २६/०३/२०१८ रोजी केलेल्या पडताळणीत लोकसेवक श्री.काझी व मोरे यांनी मी चालवित असलेल्या मे.युनिवर्सल इंटरप्रायझेस कंपनीच्या विरूध्द सुरक्षा व्यवस्था योग्य नसल्याबाबत कसुरी अहवाल पाठविण्याची भिती घालुन माझेकडे पडताळणी दरम्यान रु.९,०००/— लाचेची मागणी केली. तसेच चर्चे दरम्यान तडजोडीअंती रु.५,०००/—लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. तसेच सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.काझी यांनी रु.५०००/— लाचेची रक्कम स्विकारली असता मी दिलेल्या इशारानुसार पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आलोसे श्री. काझी व मोरे यांना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी श्री. काझीं व मोरे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

26/03/18

**( राजेश मयेकर )**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

26/3/2018